महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ / महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३		
वार आणि दिनांक	**वेळ**	**विषय भाग - १**
मंगळवार दिनांक २४ एप्रिल, २०१८	सकाळी १०-०० ते १-००	(१) पेपर क्र. १.- महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स, खंड १ व २ वगैरेंवरील प्रश्नपत्रिका (सैधांतिक) (पुस्तकांसह)
	दुपारी २-३० ते ५- ३०	(२) पेपर क्र. २.-महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स, खंड १ व २ वगैरेंवरील प्रश्नपत्रिका (व्यवहारिक) (पुस्तकांसह)
बुधवार दिनांक २५ एप्रिल, २०१८	सकाळी १०-०० ते १-००	(१) पेपर क्र. ३.- बॉम्बे फायनान्शियल रुल्स, महाराष्ट्र ट्रेझरी रुल्स वगैरे (पुस्तकांसह)
	दुपारी २-३० ते ५-३०	(२) पेपर क्र. ४.- अकाऊन्ट कोड, खंड १, २, व ४ वगैरे (पुस्तकांसह)
वार आणि दिनांक	**वेळ**	**विषय भाग - २**
गुरुवार दिनांक २६ एप्रिल, २०१८	सकाळी १०-०० ते १-००	(१) पेपर क्र. ५.-प्रेसी आणि ड्राफ्ट वरील प्रश्न (पुस्तकांशिवाय)
	दुपारी २-३० ते ५-३०	२) पेपर क्र.६.- बुक किपिंग वरील प्रश्न (पुस्तकांशिवाय)
शुक्रवार दिनांक २७ एप्रिल, २०१८	सकाळी १०-०० ते १-००	(१) पेपर क्र. ७.- महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या ॲक्ट, वगैरे वरील प्रश्न (पुस्तकांसह)
	दुपारी २-३० ते ५-३०	(२) पेपर क्र.८.- इन्ट्रोडक्शन टू इंडियन गव्हर्नमेंट अकाऊन्टस् आणि ऑडिट वगैरे वरील प्रश्न (पुस्तकांशिवाय)

परीक्षा केंद्र - १. अंजुमन ई-ईस्लाम चे सैफ तैयबजी गर्ल्स हायस्कूल, भायखळा, मुंबई - ०८

२. मारवाडी विद्यालय हायस्कूल, सरदार वल्लभभाई पटेल रोड, मुंबई - ४०० ००४

३. श्री. वेलजी लखमशी नप्पू हायस्कूल आणि ज्यु.कॉलेज ऑफ कॉमर्स, ७४ - सी. डॉ. बी. ए. के. रोड, व्होल्टास समोर, चिंचपोकळी (पूर्व), मुंबई - ४०० ०१२

४.विक्रिकर भवन,मलोआ परीक्षा दालन, ९ वा मजला, खोली क्र. ९०६, माझगांव, मुंबई - १०

Scanned by CamScanner

विभागीय परीक्षा

उमेदवारांना सूचना

1) **परीक्षेस प्रवेश** - ज्या उमेदवारांना आयोगाने परीक्षेस बसण्यास परवानगी दिली आहे त्यांना त्यांच्या वरिष्ठांमार्फत परीक्षा प्रवेशपत्र व उमेदवारांना सूचनाची प्रत देण्यात येईल. हे प्रवेशपत्र तसेच उमेदवाराचे स्वत:चे ओळखपत्र परीक्षा दालनात आणणे आवश्यक आहे, अन्यथा परीक्षेस प्रवेश मिळणार नाही. तसेच परीक्षेच्या वेळी उमेदवारांनी स्वत:ची ओळख (Identification) पटवून देण्याकरिता स्वत:चे पॅनकार्ड, आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसेंन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी 'किमान एक' ओळखपत्र व त्याची एक छायांकित प्रत तसेच कार्यालयाने दिलेले स्वत:चे ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

प्रत्येक प्रश्नपत्रिकेतील परीक्षेची वेळ सुरु होण्यापूर्वी दहा मिनिटे पूर्वसूचनेची घंटा दिली जाईल त्यावेळी उमेदवारांनी परीक्षा कक्षामध्ये येऊन आपापल्या जागेवर बसले पाहीजे. दुसरी घंटा झाल्यावर उमेदवारांनी आपली उत्तरे लिहिण्यास सुरुवात करावी. परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपासून अर्धा तास झाल्यानंतर कोणत्याही उमेदवारास परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

2) **उमेदवारांनी अनधिकृत कागदपत्रे व पुस्तके व इतर वस्तू जवळ न बाळगणे** - ज्या प्रश्नपत्रिकांची उत्तरे पुस्तकांच्या सहाय्याने लिहावयाची आहेत अशा प्रश्नपत्रिकाच्या वेळी उमेदवारांनी विभागाने अधिकृत व प्रमाणित केलेली व त्यांची स्वत:ची पुस्तके (यथास्थिती केवळ बेअर ॲक्टस आणि / किंवा रुल्स) आणून वापरावीत. परंतु परीक्षेसाठी असलेल्या कोणत्याही प्रश्नपत्रिकेवरील टिपण्या असलेली पुस्तके, मार्गदर्शिका वापरण्यास सक्त मनाई आहे. या खेरीज पेजर, मोबाईल इत्यादी संपर्काची साधने परीक्षा कक्षात आणण्यास व वापरण्यास तसेच प्रोग्रामेबल कॅलक्युलेटर वा इतर वस्तू परीक्षा कक्षामध्ये आणण्यास उमेदवारांना सक्त मनाई आहे. असे अनधिकृत साहित्य उमेदवारांजवळ सापडल्यास ते नक्कल करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगले असे समजण्यात येईल. सदर सूचनेचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास ती बाब शिस्तभंग असल्याचे समजण्यात येईल व आयोगामार्फत तसेच विभागामार्फत कारवाई केली जाईल. उमेदवारांना आयोगाकडून कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत.

3) **इतर उमेदवारांशी संपर्क** - परीक्षेत अनधिकृत साहित्याआधारे नक्कल करण्यास किंवा दुस-या उमेदवाराच्या उत्तरपुस्तिकेवरुन नक्कल करण्यास वा दुस-या उमेदवाराकडून नियमबाहय मदत घेण्यास किंवा दुस-या उमेदवाराला नियमबाहय मदत देण्यास अथवा तसा प्रयत्न करण्यास अथवा वारंवार आपल्या जागेवरुन उठण्यास सक्त मनाई आहे.

4) **परीक्षाकक्षामधून बाहेर जाण्याबाबत** - (अ) प्रश्नपत्रिका उमेदवारांना वाटप केल्यापासून पाऊण तास उलटेपर्यंत कोणत्याही उमेदवाराला परीक्षा कक्षाबाहेर जाऊ देता येणार नाही. (ब) परीक्षा चालू असताना एखादया उमेदवाराला प्रसाधन कक्षात जावयाचे असेल तर त्याने / तिने बाहेर जाण्यापूर्वी समवेक्षक व पर्यवेक्षकांची खास परवानगी घेतली पाहिजे. तशी घेतली नसल्यास त्यास / तीस परीक्षा कक्षामध्ये पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही. (क) जर एखादया उमेदवारास परीक्षा सुरु झाल्यावर पाऊण तासानंतर परंतु परीक्षेची वेळ संपण्यापूर्वी जावयाचे असेल तर त्याने / तिने जाण्यापूर्वी पर्यवेक्षकांकडे त्याची / तिची उत्तरपुस्तिका दिली पाहीजे. जे शेवटी वेळेपर्यंत राहतील त्यांनी समवेक्षकाने उत्तरपुस्तिका घेईपर्यंत आपापल्या जागेवर बसून राहीले पाहिजे.

(ड) वरील (अ), (ब) व (क) च्या अधीन राहून कोणत्याही उमेदवाराने कोणत्याही कारणास्तव पर्यवेक्षकांच्या परवानगीशिवाय आपली जागा सोडू नये.

5) परीक्षेच्या नियमांमध्ये विहित केल्याप्रमाणे उमेदवारांना प्रश्नांची उत्तरे इंग्रजी किंवा मराठीमध्ये लिहीण्याची मुभा आहे. परंतु उत्तरपुस्तिकेत ज्या भाषेत उत्तर लिहीणे सुरु केले असेल त्याच भाषेत त्या उत्तरपुस्तिकेत शेवटपर्यंत उत्तरे लिहीली पाहिजेत. अन्यथा मध्येच बदललेल्या भाषेतील उत्तरे दुर्लक्षित करण्यात येतील. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी भाषेत काढल्या जातील.

6) उमेदवाराने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना [अ, ब, क, ड किंवा 1, 2, 3, 4] सलगरित्या सोडवावेत. प्रश्नाचा एक भाग एका पानावर तर दुसरा भाग काही पृष्ठे सोडून अथवा काही अन्य पृष्ठावर उपप्रश्न सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल व अशा प्रश्नांच्या उत्तरांना शून्य गुण समजण्यात येतील.

7) उत्तरे लिहिण्यासाठी मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त पुरवणी म्हणून अन्य उत्तरपुस्तिका उपलब्ध करून दिली जाणार नाही

8) **कागदाची बचत** - उमेदवाराने उत्तरपुस्तिकेमधील पृष्ठावर दोन्ही बाजूस लिहावे. प्रत्येक प्रश्नाची सुरुवात नवीन पानावर करावी. परंतु उपप्रश्न नवीन पानावर सुरु करण्याची गरज नाही. तसेच एखादा प्रश्न अर्धवट सोडवून त्या प्रश्नाचे उर्वरित उत्तर इतर प्रश्नांची उत्तरे मधल्या पानात सोडवून किंवा मधली पाने कोरी ठेऊन नंतर पृष्ठावर लिहू नये.

उमेदवारांनी कच्चे लिखाण त्यांच्या उत्तरपुस्तिकेमध्येच करावे व ज्या पृष्ठावर ते केले असेल त्यावर रद्द असे लिहावे. त्यांनी कोणतेही कच्चे लिखाण किंवा आकडेमोड प्रश्नपत्रिकेवर किंवा अन्यत्र करु नये. उत्तरपुस्तिका समवेक्षकांकडे देण्यापूर्वी असे कच्चे लिखाण रद्द करण्याची उमेदवाराने काळजी घ्यावी. परंतु तेथे स्वत:ची वा अन्य कोणाचेही नाव / स्वाक्षरी करु नये. तसे केल्यास ती बाब शिस्तभंग असल्याचे समजण्यात येईल. एकदा नमूद केलेले उत्तर खोडावयाचे असल्यास त्यावर उभी रेषा मारुन रद्द लिहावे.

Scanned by CamScanner

प्रवेशपत्र

श्री./श्रीमती/कुमारी .....यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत .....मध्ये घेण्यात येणा-या ..... परीक्षेस बसण्यास प्रवेश देण्यात येत आहे. त्यांची साक्षांकीत स्वाक्षरी खाली देण्यात आली आहे.

पुर्वी .....मध्ये झालेल्या परीक्षेत पेपर/समुह क्रमांक .....मध्ये मिळालेल्या सुटीचा लाभ त्यांना देण्यात येत आहे.

सोबत जोडलेल्या उमेदवारांना सुचना व उमेदवारांना मार्गदर्शिका त्यांनी काळजीपुर्वक वाचाव्या व त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

उमेदवाराचा परीक्षेतील बैठक क्रमांक ————————हा आहे.

परीक्षेला प्रवेश मिळण्यासाठी हे प्रवेशपत्र दररोज परीक्षागृहात आणावे. प्रवेशपत्र दाखविल्याशिवाय परीक्षेला प्रवेश मिळणार नाही.

उमेदवाराची स्वाक्षरी

साक्षांकित करणा-या अधिका-याची सही व हुद्दा. (अधिका-याची सही व हुद्दा).

Scanned by CamScanner